

इश्काचा जहरी प्याला

डिंपल प्रकाशनने नुकत्याच प्रकाशित केलेल्या 'इश्काचा जहरी प्याला' या अनिता पाध्ये लिखित पुस्तकात मीनाकुमारी आणि तिचे पती कमाल अमरोही यांच्या नातेसंबंधांवर प्रकाश टाकण्यात आलाय. या पुस्तकातील एक भाग...

मीनाकुमारीची जी ट्रॅजीडी क्वीनची इमेज बनली ती बनवण्यात कमाल अमरोहींचा सिंहाचा वाटा आहे. मीनाकुमारी ही कसदार अभिनेत्री होती यात काहीच शंका नाही, परंतु लग्नानंतर तिने ज्या भूमिका केल्या त्यातल्या बहुतांश भूमिका कमाल अमरोहींनी निवडल्या होत्या. कसं बसायचं, कसं बोलायचं, संवादफेक कशी करायची, कुठल्या अँगलने शॉट दिला की ती वाईट दिसते त्यामुळे त्या अँगलने शॉट देऊ नये, चेहऱ्यावर रुळणारी तिची फेमस बट, डोक्यावरून पदर अथवा दुपट्टा घेण्याची तिची पद्धत आदि सर्व गोष्टी तिला शिकवल्या त्या कमाल अमरोहींनी. आपण कुठे बसलो असताना समजा पाठीमागे कुणाच्या मोठ्या बोलण्याचा आवाज आला किंवा अन्य कसला मोठा आवाज झाला तर पटकन मान फिरवून बघण्यापेक्षा मान थोडी तिरकी करून डोळ्यांच्या कडांनी बघण्यात जास्त आब आहे हे ही तिला अमरोहींनीच शिकवलं. इतकंच नाही तर, मीनाकुमारी शेरोशायरी करू लागली ती अमरोहींच्या सान्निध्यात आल्यानंतरच. याचा अर्थ तिच्याकडे प्रतिभा नव्हती असं नाही, परंतु तिच्या शेरो-शायरीच्या लिखाणाला पोषक वातावरण मिळालं ते अमरोहींमुळेच. सुरुवातीच्या काळात तिने लिहिलेली शायरी दुरुस्त करणं, त्यावर मौलिक टिकाटिप्पणी करणं या गोष्टी अमरोहीच करायचे. उर्दूत त्याला इस्लाह करणं म्हणतात. पुढे अमरोहींपासून वेगळी झाल्यानंतर आपल्या शेरोशायरीतील चुका दुरुस्त करण्यासाठी मीनाकुमारी प्रख्यात कवी-गीतकार कैफी आझमी यांचं मार्गदर्शन घेत असे. असो.

दिवस तसे मजेत सरत होते. छोट्या मोठ्या कुरबुरी सुरू असल्या तरी ती पेल्यातली वादळं असायची. अमरोही *मुगल-ए-आझमच्या* लेखनात दंग होते तर मीनाकुमारी तिच्या अपुऱ्या राहिलेल्या चित्रपटांच्या शूटिंगमध्ये. दोघांना आपल्या व्यापातून वेळ मिळाला की दोघे रमी किंवा कॅरम खेळायचे. कधी रमीत अमरोहींना हरवलं की मीनाकुमारी लहान मुलासारखी टाळ्या वाजवून आपला आनंद, आपला विजय व्यक्त करायची. कधी इंग्रजी अथवा हिंदी चित्रपट एकत्र पाहणं. पुस्तकं वाचणं यात दिवस आनंदाने सरत होते. शूटिंग नसलं तर स्वयंपाकघरात जाऊन स्वतः एखादा पदार्थ करणं किंवा घरातल्या इतर गोष्टींकडे लक्ष देणं यात तिला अजिबात रस नव्हता. तिला तंबाखू पान खाण्याचा शौक होता. कच्ची हिरवी मिरची वेलची खावी तशी ती चावून चावून खायची. मीनाकुमारीला फुलांची फार आवड होती. सिग्नलला गाडी थांबली की ती गजरे विकत घ्यायची. फ्लॉवरपॉटमध्ये फुलं सजवण्याचा मीनाकुमारीला प्रचंड शौक होता. फ्लॉवरपॉटमधील पाणी बदलणं, फुलांचे देठ नीट कापणं हे ती स्वतः करायची. सावनकुमार टाक तर तिच्या आठवणी सांगताना म्हणतात की, मीनाकुमारी जेव्हा कार्टर रोड येथील लँडमार्क बिल्डींगमध्ये रहात होती तेव्हा पलंगावर सुगंधित फुलं पसरवून त्यावर ती झोपत असे.

घरातला नेहमीचा आवश्यक खर्च अमरोही करीत असत. पण मीनाकुमारीला दागिन्यांचा, चपलांचा खूप सोस होता. (*पाकीजात* तिने जे दागिने घातले आहेत ते सर्व असली होते.) निरनिराळे चप्पलांचे जोड असलेले एक कपाट होतं. तिला हव्या असलेल्या महाग वस्तू ती स्वतःच्या पैशांनी घेत असे. कारण अमरोहींना दोन-दोन घरं चालवायची होती. अमरोह्याला बायको-मुलांना पैसे पाठवायला लागायचे. त्यामुळे केवळ एका पत्नीसाठी ते मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करू शकत नव्हते.

मीनाकुमारीच्या बहिणी खुर्शिद, मधु, सावत्र बहिण शमा आणि एकेकाळी मीनाकुमारीवर बेहद रागावून तिच्यासाठी घरचा दरवाजा न उघडणारे तिचे वडील अलीबक्ष आदि तिचे सर्व नातेवाईक लग्नानंतर काही दिवसातच कमाल अमरोहींच्या घरी येऊ-जाऊ लागले होते. कमाल अमरोहींशी त्यांचे संबंध मधूर बनले होते.

मीनाकुमारीची सावत्र बहिण शमा अमरोहींच्या घरी आली की तिचं वागणं मर्यादाशील असायचं. तिचा नवरा टॅक्सी ड्रायव्हर होता. आपण आपल्या लग्न झालेल्या बहिणीच्या-मेहुण्याच्या घरी आलो आहोत हे ती ओळखून वागायची. तर मोठी बहिण खुर्शिदचं वागणं ठीकठाक असायचं. माधुरी ऊर्फ मधु (मेहमूदची पत्नी) मात्र मीनाकुमारीच्या घरी अगदी हक्काने वावरायची. गोल गरगरीत मधु नेहमी साडीचा पदर दोन्ही खांद्यावर लपेटून घ्यायची. मेहमूदचे अमरोहींशी तसे बऱ्यापैकी संबंध होते. करीयरच्या सुरुवातीच्या दिवसांत

चित्रपटसृष्टीत स्ट्रगल करीत असताना एकदा मेहमूद काम मागण्याच्या हेतूने अमरोहींकडे आला होता. परंतु त्याचा चेहरा आणि शरीरयष्टी पाहून त्यावेळी अमरोही त्याला म्हणाले होते, 'माझ्या चित्रपटात एखादी ट्रक ड्राइव्हरची भूमिका असेल, तेव्हा मी तुला नक्की बोलवेन. तोच मेहमूद पुढे त्यांचा साडू झाला आणि काही वर्षातच चित्रपटसृष्टीतील आघाडीचा विनोदवीर बनला. नायकापेक्षा चित्रपटात त्याची भूमिका महत्त्वपूर्ण असायची. १९६६ साली त्याची भूमिका असलेला *प्यार किए जा* हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हाची गोष्ट. कमाल अमरोही बहुतेकदा रात्री नऊचा शो बघत. *प्यार किए जा* बघितल्यानंतर ते मेहमूदच्या अभिनयावर इतके खूश झाले होते की, घरी आल्या आल्या त्यांनी रात्री बारा-साडेबाराच्या सुमारास मेहमूदचं अभिनंदन करण्यासाठी त्याच्या घरी फोन केला. मेहमूद त्यावेळी कुठल्याशा शूटिंगसाठी मद्रासला गेला आहे हे कळल्यावर अमरोही गप्प बसले नाहीत. त्याच्या घरी त्याचा मद्रासचा कॉन्टॅक्ट नंबर माहिती नव्हता तरी त्यांनी तो बाकरना शोधून काढायला सांगितला. तो कुठल्या चित्रपट कंपनीच्या शूटिंगसाठी मद्रासला गेला आहे एवढ्या माहितीच्या आधारावर बऱ्याच लटपटी करून शेवटी बाकरना त्याच्या हॉटेलचा फोन नंबर मिळवण्यात यश मिळालं. आणि त्यांनी अमरोहींना मेहमूदचा फोन जोडून दिला. मेहमूद फोनवर आल्यावर अमरोहींनी त्याला फोन करायचं कारण सांगितलं, 'मी खूश झालो तुझ्या अभिनयावर. काही वर्षापूर्वी तू जेव्हा काम मागायला माझ्याकडे आला होतास तेव्हा मी ट्रक ड्रायव्हरचा रोल असेल तर तुला बोलावेन असं म्हणालो होतो. मी माझे ते शब्द मागे घेतो.' खरं म्हणजे *प्यार किए जा* जेव्हा प्रदर्शित झाला होता तेव्हा अमरोहींचे मीनाकुमारीशी संबंध दुरावले होते, पण मेहमूदचं कौतुक करताना अमरोहींनी या गोष्टीला महत्व दिलं नाही.

१९५५ साल उजाडलं होतं. अमरोही दरमहा न चुकता आलेजहराला घरखर्चासाठी मुलांच्या शिक्षणासाठी पैसे पाठवत. मोहरमच्या निमित्ताने अमरोह्याला जात. आलेजोहरा आपल्या तिन्ही मुलींबरोबर कशीतरी दिवस महिने ढकलत होती. ती अमरोह्याला येऊन दोन वर्ष उलटली होती. मुलांच्या भविष्याची चिंता तिचं मन कुरतडायची. तिला वाटत होतं आपलं एक टीक आहे. आपलं आयुष्य अमरोह्याला जाईल, पण मुलांचं काय? त्यांना पुढचं शिक्षण द्यायचं असेल तर ते मुंबईतल्या शाळेत घालायला हवं. पण मुंबईला त्यांना पाठवायचं कसं? नवऱ्याने दुसरं लग्न केलंय म्हणजे तो काही मुलांना आपल्याजवळ ठेवणार नाही. पण योगायोगाने आलेजोहराला हवी होती तशी संधी लवकरच मिळाली. एक दिवस 'शमा'मध्ये तिने बातमी वाचली 'कमाल अमरोही आजारी'. बातमी छापून आलीय म्हणजे खरोखरच कमाल अमरोही जास्त आजारी असणार.

आलेजोहराने कमाल अमरोहींचे मोठे भाऊ रजा हैदरना ही बातमी सांगितल्यावर ते लगेच आपल्या भावाला पहायला मुंबईला निघाले. ही संधी साधून आलेजोहरा त्यांना म्हणाली, 'जाताना तुम्ही ताजदारलाही बरोबर न्या. तोही त्याच्या वडिलांना बघेल-भेटेल.'

ताजदारला वयापेक्षा अधिक समज असल्यामुळे तिने शानदारऐवजी त्याला मुंबईला पाठवण्याचा निर्णय घेतला. ताजदारची तयारी केल्यानंतर ती त्याला स्टेशनपर्यंत सोडायला निघाली. घरापासून स्टेशनपर्यंतचा रस्ता वीस मिनिटांचा होता. ती आणि ताजदार एका टांग्यात तर दुसऱ्या टांग्यात सामानासह रजा हैदर.

त्या वीस मिनिटांच्या प्रवासात आलेजोहरा नानापरीने आपल्या मुलाला हेच सांगायचा प्रयत्न करीत होती की आपल्या सावत्र आईशी चांगला वाग. 'हे बघ ताजदार, तुझे बाबा आजारी आहेत. त्यांना त्रास होईल असं वागू नकोस, तिथे छोटी अम्मी आहे, तिला आईसारखाच मान दे, तिचा अपमान करू नकोस, ती तुझ्या बाबांची लाडकी बायको आहे. त्यामुळे तिच्याशी वाईट वागलास तर तुझ्या बाबांच्या आनंदावर विरजण पडेल. तुला जन्म दिला म्हणून मला कुणी दोष देईल असा वागू नकोस माझ्या राजा.'

'खरंच मी चांगला वागेन. तुला कुणी नावं ठेवतील असा वागणार नाही' छोटा ताजदार म्हणाला.

त्यावेळी अमरोहा ते मुंबई हा अडतीस तासांचा रेल्वे प्रवास होता. आईचं बोलणं डोक्यात भुंगा घालत होतंच. पण छोटी अम्मी कशी असेल, ती आपल्याला मारेल-रागावेल का? या आणि अशा अनेक प्रश्नांनी ताजदार मनातल्या मनात भेदरून गेला होता. एकदाचा प्रवास संपला आणि ताजदार आणि रजा हैदर कमाल अमरोहींच्या वांद्रा येथील फ्लॅटवर दाखल झाले. दरवाजा उघडल्यावर नोकराने अदबीने त्यांचं स्वागत केलं आणि कमाल साहेब आतल्या खोलीत असल्याचं सांगितलं.

ताजदार आतल्या खोलीत गेला तर पांढरी शुभ्र चादर अंथरलेल्या मोठ्या पलंगावर सफेद रंगाचा झब्बा-पायजमा घातलेले कमाल अमरोही झोपले होते आणि त्यांच्या शेजारी पांढरी शुभ्र साडी नेसलेली एक बाई कोलन वॉटरची घडी कमाल अमरोहींच्या कपाळावर ठेवीत होती. पांढऱ्या साडीतल्या आणखीन दोन-तीन बायका खोलीत वावरत होत्या. ताजदारला प्रश्न पडला यातली छोटी अम्मी कोण? सर्वच बायकांच्या साड्या पांढऱ्या स्वच्छ. दिसायलाही सर्व चांगल्या आहेत. कमाल अमरोही सौंदर्याचे इतके भोक्ते होते की, केवळ त्यांच्या जीवनात आलेल्या स्त्रियाच फक्त सुंदर होत्या असं नाही तर घरातील पुरुष नोकर व वरकाम करणाऱ्या बायकासुद्धा चांगल्या दिसणाऱ्या किंबहुना कुरूप नसाव्यात याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. घरातील पडदे, पलंगावरील चादरी एवढाच काय पण नोकरांचे ड्रेस, कामवाल्या बायकांनी सुद्धा स्वच्छ, सफेद साड्या नेसायला हव्यात असा त्यांचा आग्रह असे. अस्वच्छता त्यांना मुळीच खपत नसे.

पण छोट्या ताजदारला त्यावेळी या गोष्टींची कल्पना नव्हती. त्यामुळे त्याने तिथल्या सर्वच बायकांना कमरेत वाकून नमस्कार सलाम केला. 'आदाऽऽब.' तेवढ्यात पलंगावर बसलेली स्त्री उठली आणि त्याला म्हणाली, 'मी तुझी छोटी अम्मी आहे आणि या घरात काम करणाऱ्या बायका आहे. ये इकडे माझ्याजवळ.' रेल्वेच्या प्रवासात ताजदारचे कपडे इतके मळले होते, आंघोळ न केल्यामुळे अंग इतकं मळलं होतं की पांढरी साडी नेसलेल्या छोटी अम्मीकडे जाणं त्याच्या जीवावर आलं. तापाने फणफणल्या अवस्थेतही ताजदारची कुचंबणा कमाल अमरोहींच्या लक्षात आली आणि ते त्याला म्हणाले, 'जा बेटा, आधी आंघोळ कर, कपडे बदल.'

छोटी अम्मीने प्रेमाने केलेलं स्वागत, तिचं हसून प्रेमाचं बोलणं यामुळे ताजदार खूप खूश झाला. लवकरच त्याची आणि मीनाकुमारीची गट्टी जमली.